दिनांक 23/08/2022

-:- **प्रेसनोट**-:-

**आलोसे श्री.राहुल दशरथ लहाने, वय 31 वर्षे, व्यवसाय- नौकरी, पद- पोलीस नाईक, पोलीस ठाणे फुलंब्री औरंगाबाद ग्रामीण यांनी तक्रारदार यांच्याकडुन रु.3,000/- लाचेची रक्कम स्विकारल्याने, लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, औरंगाबादच्या जाळयात.**

| | | |
|---|---|---|
| लाचलुचपत प्रतिबंधक विभाग | :- | औरंगाबाद |
| गुन्हा नोंद क्रं. | :- | पोलीस ठाणे फुलंब्री औरंगाबाद येथे गुन्हा दाखल करण्याची प्रक्रिया सुरु आहे. |
| आरोपी लोकसेवक यांचे नाव हुद्दा व पत्ता | :- | श्री.राहुल दशरथ लहाने,वय 31वर्ष, धंदा-नौकरी, पद-पोलीस नाईक, पोलीस ठाणे फुलंब्री, औरंगाबाद ग्रामीण रा. पवन नगर, खुलताबाद रोड, फुलंब्री औरंगाबाद |
| लाच मागणी रक्कम | :- | 5000/- रुपये मागणी करुन तडजोडी अंती-3000/- रुपये लाचेची रक्कम मागणी |
| लाच स्विकृती रक्कम | :- | 3000/- रुपये |
| तपास अधिकारी | :- | श्री. संदीप राजपुत, पोलीस निरीक्षक, लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, औरंगाबाद |
| थोडक्यात माहिती | :- | यातील तक्रारदार यांनी दि.22/082022 रोजी त्याचे नातेवाईक यांची तक्रार(एनसी) पो.ठाणे फुलंब्री येथे देण्यासाठी गेले असता पोलीस श्री राहुल लहाने याने तक्रारदार यांच्या नातेवाईकाची तक्रार दाखल करुन घेण्यासाठी व तक्रार दाखल केल्यानंतर कारवाई करण्यासाठी 5,000 रुपये लाचेची मागणी करित असल्याने, तक्रारदार यांना लाच देण्याची इच्छा नसल्याने, त्यांनी दि. 22/08/2022 रोजी लाचलुचपत प्रतिबंधक विभाग औरंगाबाद या कार्यालयात तक्रार दिली.<br>तक्रारदार यांचे तक्रारीवरुन दि.22/08/2022 रोजी केलेल्या पडताळणी दरम्यान पोलीस नाईक श्री राहुल लहाने यांनी तक्रारदार यांना रुपये 5,000/- लाचेची मागणी करुन तडजोडीअंती 3000/- रुपये पंच साक्षीदारांसमक्ष स्विकारण्याचे निष्पन्न झाले.<br>त्यावरून लाचलुचपत प्रतिबंधक विभाग,औरंगाबाद तर्फे दि. 23/08/2022 रोजी सापळा आयोजीत केला असता, आलोसे श्री राहुल लहाने पोलीस नाईक/1198 ने.पोलीस ठाणे फुलंब्री ओरंगाबाद ग्रामीण यांनी पंच साक्षीदारासमक्ष ठरलेली लाचेची रक्कम 3,000/- रुपये स्विकारल्यानंतर लाचेच्या रक्कमेसह त्यांना ताब्यात घेण्यात आले आहे. त्यांचे विरुद्ध पो.ठाणे फुलंब्री,औरंगाबाद ग्रामीण येथे गुन्हा दाखल करण्याची प्रक्रिया सुरु आहे. |

सदर कारवाई, पोलीस अधीक्षक मा.डॉ.राहुल खाडे, अपर पोलीस अधीक्षक मा.विशाल खांबे, पोलीस उप अधिक्षक श्री.मारुती पंडित यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस निरीक्षक- श्री. संदीप राजपुत यांनी कारवाई केली आहे. त्यांना सदरच्या कारवाई कामी पोना/भुषण देसाई, दिगंबर पाठक, पोअ/केवलसिंग घुसिंगे, चालक-चंद्रकांत बागुल यांनी मदत केली आहे.

लाचलुचपत प्रतिबंधक विभागातर्फे नागरिकांना आवाहन करण्यात येते की, भ्रष्टाचारासंबंधी काही माहिती असल्यास अगर लाच मागणा-या लोकसेवकाबद्दल तक्रार असल्यास लाचलुचपत प्रतिबंधक विभाग यांचेशी संपर्क साधावा.

| | |
|---|---|
| संपर्क पत्ता | :- लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, औरंगाबाद |
| ई- मेल | :- sp1acbaurangabad@gmail.com, 2) dyspacbabad@gmail.com |
| ऑनलाईन तक्रार ॲप्लीकेशन | :- acbmaharashtra.net |
| फेसबुक | :- www.facebook.com-Maharashtra.gov.in |
| संपर्क क्रं. | :- 0240-2344050, टोल फ्रि क्रं. 1064, |
| पोलीस अधीक्षक | :- 8888807299 |
| अपर पोलीस अधीक्षक | :- 8788644994 |
| पोलीस उप अधीक्षक | :- 9356115189 |

**(मारुती पंडीत)**
**पोलीस उप अधीक्षक,**
**लाचलुचपत प्रतिबंधक विभाग औरंगाबाद.**